# पुणे महानगरपालिका

## जाहिर प्रकटन

जाहिरात क्र.-------- दिनांक / /

पुणे शहरातील पुणे मनपा कोर्ट, पुणे जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालये, ग्राहक मंच व हरित लवाद तसेच महसुल खात्याकडील पुणे महानगरपालिका पक्षकार असलेल्या दाव्यांमध्ये तसेच महापालिकेच्या निरनिराळया खात्यांस अभिप्राय देणेकामी पुणे महानगरपालिकेचे वतीने वकील म्हणून कामकाज पहाणेकरिता वकिलांच्या मान्य फी धोरणानुसार शर्ती अटींवर नेमणूक करणे असून त्याकरिता पात्रता धारण करणा-या वकिलांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र वकिलांनी आपले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह मा.महापालिका आयुक्त यांचे नावे दि 6/03/2023 पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव | व्यावसायिक फी रूपये | अनुभव/प्रॅक्टिस |
|---|---|---|---|
| पॅनेलवरील वकिल | मान्यताप्राप्त विदयापीठाची विधी शाखेची पदवी | महानगरपालिकेच्या मान्य धोरणानुसार | किमान १० वर्षे मे. न्यायालयात प्रत्यक्ष प्रॅक्टीसचा अनुभव/ कन्व्हेयांसींग व कायदेशीर सल्लागार म्हणून कामकाज करण्याचा १० वर्षाचा अनुभव |

अटी व शर्ती :-

१. वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक.

२. सदरची नेमणूक अस्थायी स्वरुपाची ३ वर्षे कालावधी करीता मानधन व पॅनेल तत्वावर असल्याने या पदावर कायमस्वरूपी नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

३. उमेदवारांनी अर्जासोबत दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आवश्यक मुळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती व अनुभवाच्या मूळ सत्यप्रतीचे दोन संच सादर करणे आवश्यक आहे.

४. उमेदवाराने सादर करावयाच्या विहित नमुन्यातील अर्ज www.pmc.gov.in या संकेतस्थळावर Recruitment या सदरात उपलब्ध होईल. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्जाची प्रिंट काढून आवश्यक त्या कागदपत्रांसह खाली नमूद पत्यावर सादर करणे आवश्यक आहे.

५. उमेदवारास नियुक्ती देण्याबाबत सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकाराचा दावा सांगता येणार नाही.

६. निवड झालेल्या वकिलांना मुख्य विधी अधिकारी, विधी विभाग पुणे मनपा यांचे कार्यालयात दररोज वेळेवर उपस्थित राहून रोजचे रोज त्यांचे मार्गदर्शनाखाली कामकाज करावयाचे असून सदर कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

७. मुलाखातीस येणा-या उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

८. शासकीय, निमशासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीचा अनुभव असल्यास नमुद करावा.

९. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०. पुणे मनपाचे विरुध्द कोर्ट केसेस किंवा कायदेविषयक कामे वरील नेमणूकीच्या मुदतीत स्विकारता येणार नाहीत.

११. सदर पॅनेल नेमणूक प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे, रद्द करण्याचे व प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१२. पात्र उमेदवारांची संख्या नियंत्रित करण्यासाठी अर्जदारांची छाननी करणे अथवा लेखी परीक्षा किंवा मुलाखत घेणे यासंदर्भातील अंतिम निर्णय मा. महापालिका आयुक्त यांना राहील.

१३. पात्रता धारण करित नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

वरील पदाकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक वकिलांनी दि.२०/०२/२०२३ ते दि.०६/०३/२०२३ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं.५.०० या वेळेमध्ये आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित विधी विभाग खोली क्र.२१९ दुसरा मजला, मुख्य इमारत, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे-४११००५ येथे सादर करावेत. वरील मुदत संपल्यानंतर सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका